**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – गोविंद मनोहर पवार,
वय -४५ वर्षे, धंदा - शेती.
रा. धसवाडी, ता. अहमदपूर, जि.लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे**

**०१.** दि.१८/०७/२०२४ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नव्हते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुराची मला माहिती नाही. घटनास्थळ पंचनामा यास सहीपुरते **निशाणी क्र. ६१** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८/०७/२०२४ रोजी पोलीसांनी मला धसवाडी शिवारात गट क्र. ४६५ मध्ये पंचनामा करण्यासाठी बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी, आम्ही पंच व पोलीस हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष घटनास्थळाची पहाणी करण्यात आली. त्याठिकाणी काठया व दगड पडलेले होते. त्याबाबतचा पंचनामा माझ्या समक्ष करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष काठया व दगड जप्त करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा वाचून दाखविण्यात आला त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, कुठल्याही पेपरवर मी वाचल्यानंतर सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचे असल्याचे खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**आरोपीं तर्फे उलटतपास वकील श्री.एस.व्ही.देशमुख यांच्यामार्फत सुरु:-**

**०२.** नाकारला.
उलट तपास पुर्ण.
फेर **तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -२९.१०.२०२५